६२

वंदे मातरम् ।

शाहिरी...........डफ

# पोवाडा ६ वा

## शेरास-सव्वाशेर

अर्थात्

# अफझलखान वध

लेखक—प्रल्हादराय

जळगांव पूर्व खानदेश

आवृत्ति १ली शके १८५५

मूल्य २ आणे.

प्रकाशक
मखेडकर आणि सन्स्
जळगांव, पूर्व खानदेश

[ लेखकानें सर्वप्रकाचे हक्क आपले स्वाधीन ठेवले आहेत. ]

मुद्रक
शंकर रामचंद्र दाते,
अ. वि. गृहाचा लोकसंग्रह छापखाना
६२४ सदाशिव पेठ पुणें.



# प्रस्तावना.

महाराष्ट्र–शाहीर प्रल्हादराय ( जामखेडकर ) यांचा "अफझल-खानाचा ( शेरास सव्वाशेर ) पोवाडा प्रत्यक्ष शाहीराच्या मुखांतून ऐकला. त्यावेळीं मला या पोवाड्याच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्यास सांगतील ही मुळींच कल्पना नव्हती, परंतु पोवाडा संपून डफाचा नाद थंडावल्यावर त्यांनीं मला माझें मामुली वहिवाटीप्रमाणें मत न विचारतां शांतपणें "मला हा पोवाडा लवकरच छापावयाचा आहे तर याची कृपाकरून प्रस्तावना लिहाल काय? " अशी विनंति केली. मला वाटतें कीं माझ्या चेहऱ्यावरूनच मला सदर पोवाडा आवडल्याचें ओळखिलें असावें; आणि मला प्रल्हादरायांचा हा पोवाडा खरोखरच फार आवडला.

शाहीरी कविता ही शाळाऊ कविता नव्हे. तिला अन्वयार्थांचा खटा-टोप नकोच असतो. व्याकरणाच्या बेशिस्त शिस्तीला ती दुरूनच वंदन करिते. कारण भावनाप्रधान अशा बहुजन समाजाच्या हृदयांत तिला शिरा-वयाचें असतें. " भावनावश असें तुमचें हृदय द्या. मग तुमचें डोकें बुद्धि-मान आहे कीं नाहीं हें मी पहाणार नाहीं. " अशी शाहिराची पहिलीच डफावरची थाप असते. " तुम्ही बुद्धीच्या थापा माझ्यासमोर मारूं नका. " ही त्याची तुणतुण्याची तार असते. पूर्वज पराक्रमाचें त्याचें असें मधुर ध्रुपद असतें कीं त्याच्या नादांत शाहीर शत्रूच्या पराक्रमाला सुद्धा वंदन करतो. प्रल्हादरायांचा अफझलखान हा महाराजांना शोभणाराच शत्रू झाला आहे. फक्त त्यानें प्रतापगड, वाई, पंढरपूर वगैरे ठिकाणीं केलेले अत्याचार त्याच्या असभ्य व धर्मांध सैनिकांनींच केले असा त्याच्याहि चारित्र्याला उजळा मिळावयाचा होता. एकतर अफझलखान खरोखरच सभ्य होता. शिवाय महाराजांचें शत्रुत्व व्यक्तिवाचक नसून, किंवा जातिवाचक नसून केवळ स्वातंत्र्य वाचक होतें म्हणून त्यांनींही " खानाचा खून " केला नाहीं तर "खुणेचा खान" केला हें ऐतिहासिक तत्त्व, ही तत्कालीन भावना आमच्याही भावनांना अधिक जागृत करती, तथापि आहे तें वर्णनही रास्त आहे.

या पोवाड्यांत त्या प्रसंगाचीं वर्णनें तर बहाराचींच आहेत. तीं तीं चित्रें माझ्या नेत्रासमोर उभीं राहिलींच, परंतु त्या काळचें वातावरणदेखील माझ्या भोंवतीं उत्पन्न झालें. मी चौकाचौकांतून जातांना शके १८५५ साल तर विसरलोंच परंतु सह्याद्रीची शके १५८१ मार्गशीर्षातील थंडीच मला वाजत असल्याचें आतां आठवतें. महाराजांच्या पोषाख वर्णनानेंही अंगावरल्या कोटाची विस्मृति पडली. मला वाटतें हा प्रभाव श्रोत्यांचाच खरा. परंतु ऐकण्यास तयार असलेल्या कानावर जर सन १९३३ चे सूर पडले तर तो तरी बिचारा काय ऐकणार; प्रल्हादरायांचा डफ एकसारखा तत्कालीन सुरांनाच साथ करीत होता. "इतकी भाषा सोपी कशीहो ?" असा आक्षेप करण्यापेक्षां "आणखी जास्त डोंगरी भाषा कां नाहीं हो ?" असा आक्षेप घेतल्यास चालेल— पण माझी हल्लींची वृत्ति आक्षेप घेण्याची नाहींच. उलट हे महाराष्ट्राचे मुळे, खाडिलकर, प्रल्हदरायादि शाहीर दऱ्याखोऱ्यांतून, खेड्यामळ्यांतून व किल्याकपाऱ्यांतून पोवाडे म्हणत कां हिंडत नाहीत, असेंच वाटतें.— पण त्यांचा चरितार्थ कोणी चालवावा, प्रल्हादराय उद्वेगानें म्हणतातः—

शाहीरानें करतां पोवाडा। सोन्याचा तोडा। आणि एक घोडा। रायानें बक्षिस दिधला त्यास। धन्य दाता शिवाजी झाला। आज कोण बोला। देतो हो मला। अशा बक्षिसास ॥

दारिद्र्यांत पंक रुतले। हालहाल झाले। बेकार वाढले। देणार कोठला मज तोडा। फार झालं तर हाताला। आणि पायाला। घाला खोड्याला। पुण्य हें जोडा ॥ जी. जी. जी. ॥ १ ॥

अशा निरुत्साही काळांतही हे गरीब बिचारे महाराष्ट्रीय शाहीर डफाला फिरून घुमावयास लावीत आहेत, तेव्हां धन्य यांची !

हल्लीं मुक्काम—जळगांव
ता. १२ ऑगस्ट १९३३

**नाथ निफाडकर**
संपादक वाङ्मय, नाशिक.

———



# चार शब्द

माझे विनंतीस मान देऊन श्री. नाथ निफाडकर यांनीं प्रस्तुत पोवाड्यास प्रस्तावना लिहून दिली, त्याजबद्दल मी त्यांचा आभारी आहें. त्याचप्रमाणें लोकसंग्रह छापखान्याचे चालक श्री. शंकर रामचंद्र दाते यांनीं अत्यंत त्रास सोसून हे पोवाडे छापले त्यांजबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होतील.

सर्वांचा कृपाभिलाषी

**शाहीर**

जळगांव पूर्व खानदेश
मिति भाद्रपद शु. ४ थी १८५५

पुणें प्रदर्शनमध्यें रौप्य पदक मिळालेलें
**मेंदूच्या सर्व विकारांवर रामबाण औषधी**
थंड ] **नेहेते** ब्रदर्स मालेगांवी **आंवळेल** [ पवित्र
वापरा. ह्या तेलांत कृत्रिम रंग नाहीं आणि यांत एकही विदेशी पदार्थ वापरलेला नसून अनेक वनस्पतीपासून हें तेल तयार केलेलें आहे.
**प्रो. नेहेते ब्रदर्स उद्योगभुवन जळगांव**

दानधर्माचे वेळीं
पुणें अनाथ विद्यार्थी गृहाची
अवश्य आठवण ठेवा
**अनाथ विद्यार्थी गृह पुणें व नासिक शाखा.**

जय हिंदमाता

शाहिरी—डफ

पोवाडा ६ वा

# शेरास सव्वाशेर

अर्थात्

# अफझलखानाचा वध.

ले०—प्रल्हादराय

खानाचा बळी पाहून । अंबा तोषून । बोले प्रेमान । शिवबा तुझा बोलबाला होणार । करविन तुझ्या करवी संहार । प्रल्हादराय त्याचि किर्ती गाणार । जी जी....।। धृ० ।।

## चौक १ ला

चाल—धर्मग्लानि नष्ट करण्यास । लागला ध्यास । महाराष्ट्रास । प्रगटले सारे अष्ट दिग्पाळ । आणि मुख्य एक । रुद्र अवतार । शिव भूपाल । मोडितो यवनभूप बंडाळ ॥

चाल—शिवाजीनें करतां हैराण । झाले दाणादाण । घेतलं वैराण । इतक्यामंधीं वार्ता कळली शहास । ऐकतांच धडकी भरली हृदयांत । परकार काय घडला सांग्तों समद्यास ॥

चाल—मुलाणा चाल्ला इजापुरला । कल्याणाची दौलत संगतिला । वार्ता कळ्ली सर्ज्याच्या हेराला । राया होता आपले सदरेला । खबर गेली त्याचे हो कानाला । बोल्ला काय तवा मावळ्याला । अरे बघ्ता काय लुटा खजीन्याला । मर्द नेताजी म्होरक्या झाला । लुटुन नेल समद्या दौलतीला । मुलाणा पोहोंचला इजापुरला । धायधाय रडला कचेरीला । म्हणला काय तवा आपल्या शहाला । शिवाजीनं मारलं खजिन्याला । पळतां भुई थोडी झाली आम्हाला फेस तोंडीं आला ॥ तोबा तोबा गनिम दिस्तो डोळ्याला । तशीच धडकी भरली समद्या सैन्याला । पळून गेले सारे चहू मुलखाला । अल्ला अल्ला राख माझे

कटकाला । शहा पाय आफळी जागचे जागेला । जशी काय अ
लागली देहाला । तडतडां तोडतो बघा दाढीला । कडकडा फोडलं त
वठाला । करकरा खाल्लं त्यानं दांतांला ॥ दांतवठ खाऊनशान हुकू
केला वजिराला ॥ बोलवा माझ्या समद्या राऊताला । अफजल रुस्त
हिलालाला । बंबाजी भोसला, कोकजी नायकाला । अमिर उमराव जम
सदरेला । जागा नव्हती दरबारीं बसायाला । बोलला काय तवा मा
कऱ्याला ॥

चाल--पहाडकां चुव्वा हुवा बडा मस्त । डालो तुम गस्त । पकड
दरोबस्त । जिंदा पकडकर लावो यार । नहीं तो करो उसीको ठार
बढो कोई आगे मनसबदार ॥ १ ॥

## चौक २ रा

चाल—शहा बोले शहाजी राजाला । ऐका वार्तेला । सांगत
तुम्हाला । लुटून नेलें द्रव्य आमुचें । घाटाखालील कल्याण प्रांतिचें
शिवाजीनं मावळयाला सांगावं । मावळयांनीं ऐकावं । घालावा घाला
शिवाजीला छंद लागला । तुझ्यारे पोराला । आणि दादाजीला । हिंदुचं
सत्ता स्थापावी । अदिलशाही सत्ता मोडावी । हिरवा झेंडा त्यानें बुड
विला । आम्हावरी घाला । केलं बंडाला ॥

चाल—तुझ्या पोराची बुद्धि रे खोल । कळेनारे तिचें तें मोल
राज्य माझें घशांत घालील ॥ त्यानं त्रस्त केलं यवनास । चंद्रराव
तसच शाहीस । गनिमीनें लढुनी रात्रंदिस ॥

चाल—आजवरि सहन शक्तिला । ताण फार झाला । ताण फार
झाला । आजवरी पाहूनि मुखाकडे । हे जाणुनि पोर आमुचे । सहावेना
आतां ते मजला । त्याचे ढंगाला । सोडवी त्याला ॥ तुम्ही दावा तुमचे
पोराला । सांगतो तुम्हाला । ऐका या काला । बादशाही फर्मान आमुचें ।
चहू मुलखीं काढुनि सक्तीचें । शिवाजीला धरूनी आणावं । अगर
मारावं । मोडा पुंडावा ॥ भोसले बोलून बोलीला । सांग्ती शहाला ।



ऐका शब्दाला । पोर राहिलं नाहीं ताब्यांत । विशदचि असे राज्यांत ।
जाणूनी द्यावें प्रायश्चित्त । घेऊन ताब्यांत । आज या काला ॥

चाल—शहा रखे मजलीस मे पान । कहे फर्मान । दौडो कोई
खान [illegible]सीको दस्त करो या ठार । देऊंगा दौलत और हत्यार । बढता
है क्या कोई आगे शेर ॥

चाल—शिवाजीची भिती दरेकाला । कोण जवळ करिल मृत्युला ।
कसं खिशांत घालावं इस्त्याला ॥ अस मनांत म्हणती सरदार । मुखां-
वरील बदलला नुर । ज्याचा तोच मनामधी चुर ॥

चाल—दरबारी गलबला झाला । धरण्या शिवबाला । धाडु
कोणाला । सर्व पेचांत पडले उमराव । खानानं भरला मिशीवर ताव ।
शिवा पकडुंगा झाला निश्चाव ॥

चाल--इतक्यांत आवाज घुमला । मय पकड लाऊंगा बोला ।
असं म्हणून खान पुढें झाला । पैजेचे पुढें ठेवलं होतं पान । त्याकडेच
थांबला खान । अफजूल उचली तें तें पान ॥

चाल—खान प्रतिज्ञा करी घनघोर । चुव्वा पकडुंगा नही मुझे
डर । पेष करताहुं बारोबार ॥ बादशहा निहात खुष झाला । दिली
बक्षिस कटयार खानाला । जडावाची मुठ होती तिजला ॥

चाल—हत्ती उंट राऊत आणि वाण । जमा करून कटक खानानं ।
डेरे द[illegible]ल केले ते त्यान ॥ डेरे दिले येशीबाहेर । पाच्छाचा हत्ती बिनी-
वर । एकाएकीं हत्ती झाला ठार । अपशकून होतांच खानास । धक्का
बसला त्याचे मनांस । सैन्यासह कूच केलं त्यानं ॥

चाल—राजे खलिता लिहीती शिवबाला । कठीण काळ आला ।
राखावें राज्याला । जीव गेला तरी बेहेत्तर । सामन्यास व्हावें तय्यार ।
स्व-राज्यास आडवें येतील । काढावें कापून । त्याची वक्ताला ॥

चाल—असं लिखाण लिहून सर्जाला । धाडलं समयाला । पुणें
प्रांताला । राया गेला प्रतापगडीं राहण्यास । आकारांत चौक आला
आयास । खानाचा जुलुम पुढच्या चौकास ॥ २ ॥

## चौक ३ रा

चाल—खान चालला अति वेगानें काळ त्याचा ओढवला। दल-भारासह कित्येक सरदार होते त्याच्या दिमतीला ॥

चाल—बारा हजारांचें घोडदळ त्याचे संगतीला ॥ आरोब्याच्या गाडया कित्येक होत्यां गनतीला॥ सातशें उंट बाणाचा होता भरलेलं॥ खानाचा करडा अंमल रयतेवर जुलूम करत चालला ॥ कोसळलं निशाण पुन्हा धडकी भरली खानाला ॥ अपशकून होती पुनः पुन्हा त्याच खानाला ॥ तरी तसाच चाळला पहा वाई प्रांताला ॥ दौडीवर दौडी मारून आला तुळजापुरला ॥

चालः–तुळजापुरच्या फोडलं देवीला । जात्यांत घालून भरडलं तिला। पाडून टाकलं तिच्या देवळाला। मसुद बांधली त्याच जागेला। चरचरा कापून गाईला। म्हणें कांहीं अजमद दावी तुम्हाला। भद्रकाली कोपली गेली शिवाचे सप्नाला।

चालः–बत्तीस दांतांचा बोकड येईल बळी द्यावारे तूं मजला। फाडफाडूनी असूद काढुनि अभिषेक करवी तूं मजला॥ तेथून केलें कुच खानानें तळ पडला माणकेश्वरला। माणकेश्वरची पिंड फोडूनि नीट लागला रस्त्याला।

चालः–वैकंठपुरीची शोभा विलसे। भुवरीं पंढरपुर। क्षेत्र तें। शेष वर्णिता थकून गेला मी पडलों पामर॥ त्या क्षेत्रांमधीं अफजल शिरतां केलं त्यानं बेजार। हिंदुला। देवदेवता भ्रष्ट करूनि हिंदुस दिधला मार॥

चालः–पुंडलिक उचलुनि फिरविला गरगर ॥ जलसमाधी त्यासि देई तो भरभर॥ विठ्ठल राणा नष्ट कराया चाले तो झरझर॥ विठ्ठल नाहीं हातीं लागला दैव त्याचं खडतर ॥

चालः–खान चालला पुढें रोषानं धुमाकुळ करीत त्वेषानं।/ किती वर्णू त्याचें मी पाप। तुम्हा ऐकतां येईल संताप ॥

चालः-किती मूर्ति फोडल्या वाटेला । बाटवलं कितीक लोकांला । कितीकांच्या घेतलं अब्रुला । आवा किति बळि पडल्या चैनीला। शेंडी धरून मारतो हिंदूला। उलट टांगून ठेवतो झाडाला। थांबून थांबून मारितो भाला। कैकांच्या फोडलं डोळयांला। कैकांच्या तोड[illegible]ंडक्याला । अफूचा कैफ डोळयाला । कैकांच्या आवा पळविल्या । असं छळून समद्या रयतेला । जाळपोळ लुटालुट करून पोंहोचला वाईला ॥

चालः-काळ खानाच्या समीप आला म्हणूनि आला तो जवळ। कारवाई त्याची पुढच्या चौकाला सांगेन तुम्हा ती सकळ ॥ ३॥

## चौक ४ था.

वांई गावाला तळ ठोकुनि खान बसला ऐटींत । शिवरायाला दस्त कराया बिकटच पडला पेचांत ॥ पेंच मोठा बिकटचा पडला येईना त्याचे डोक्यांत । डोकं खाजवून दाढी हालवूनि दमून झाला तो भ्रांत । भ्रांत चित्तानें विचार करितां युक्ति आली डोक्यांत । कपट करोनि आणीन येथें । घालीन त्याला मी गोत्यांत॥ गोता देऊनि दस्त करोनि नेईन त्याला मी हुजुरात । हुजुरापुढती हजर करूनि । मागेन मग मी हो वजिरात। वजीर होवोनि चैन करीन मी बिव्या आणीन त्या महालांत। महाल भरीन मी हिंदु बायकांनीं। आहे माझ[illegible]ईं ध्यानांत ॥ ध्यानांत ऐसे विचार येतां वकील नेमावं मी कोणास। कृष्णाजी भास्कर नजरेस पडतां वकिल नेमिले त्यानें त्यास ॥

चालः-इकडे काय घडला परकार ऐका साधार। शाहीर सांगणार। गडावर मावळा जमला आटोकाट। चालाया नाहीं जराशी वाट। वर्णावा काय दरबारी थाट ॥

निलांबरी त्या तारा पसरल्या । लुकलुक करिती त्या गगनांत । गगनांतील ही दौलत विखुरे। हिऱ्यामोत्याची जणु बरसात। नभीं



ऐका शब्दाला । पोर राहिलं नाहीं ताब्यांत । विशदचि असे राज्यांत। जाणूनी घावें प्रायश्चित्त । घेऊन ताब्यांत । आज या काला ॥

चाल—शहा रखे मजलीस मे पान। कहे फर्मान। दौडो कोई खान। उसीको दस्त करो या ठार। देऊंगा दौलत और हत्यार। बढता है क्या कोई आगे शेर ॥

चाल—शिवाजीची भिती दरेकाला। कोण जवळ करिल मृत्युला। कसं खिशांत घालावं इस्त्याला ॥ अस मनांत म्हणती सरदार। मुखांवरील बदलला नुर । ज्याचा तोच मनामधी चुर ॥

चाल—दरबारी गलबला झाला। धरण्या शिवबाला। धाडु कोणाला । सर्व पेचांत पडले उमराव । खानानं भरला मिशीवर ताव । शिवा पकडुंगा झाला निरचाव ॥

चाल--इतक्यांत आवाज घुमला। मय पकड लाऊंगा बोला। असं म्हणून खान पुढें झाला। पैजेचे पुढें ठेवलं होतं पान। त्याकडेच धांवला खान। अफजूल उचली तें तें पान ॥

चाल—खान प्रतिज्ञा करी घनघोर । चुव्वा पकडुंगा नही मुझे डर । पेष करताहुं बारोवार ॥ बादशहा निहात खुष झाला । दिली बक्षिस कटयार खानाला । जडावाची मुठ होती तिजला ॥

चाल—हत्ती उंट राऊत आणि वाण। जमा करून कटक खानानं। डेरे दाखल केले ते त्यान ॥ डेरे दिले येशींबाहेर। पाच्छाचा हत्ती विनीवर । एकाएकीं हत्ती झाला ठार । अपशकून होतांच खानास। धक्का बसला त्याचे मनांस। सैन्यासह कूच केलं त्यानं ॥

चाल—राजे खलिता लिहीती शिवबाला। कठीण काळ आला। राखावें राज्याला। जीव गेला तरी बेहेत्तर। सामन्यास व्हावें तय्यार। स्व-राज्यास आडवें येतील। काढावें कापून। त्याची वक्ताला ॥

चाल—असं लिखाण लिहून सर्जाला। धाडलं समयाला। पुणें प्रांताला। राया गेला प्रतापगडीं राहण्यास। आकारांत चौक आला ठायास। खानाचा जुलुम पुढच्या चौकास ॥ २ ॥

राजाच्या कला विकसुनि प्रकाश देती त्या सर्वास। प्रकाश देऊनि स्वयंप्रकाशें शोभा देई तो सर्वांत। शिवराया तो शोभा देई तसा आपुल्या या गगनांत। शोभा देऊनि स्वयंप्रकाशें चमके राजा तो सर्वांत। सह्यगिरीच्या उंच शिखरीं अवघड किल्ले यशकारी। यशोदुंदुभि नित्य ती झडते दख्खल त्याची पृथ्वीवरी॥ प्रतापगडच्या किल्यावरती राया बसला नवगजीत। यश वर्णूं मी काय रायाचं साह्य भवानि त्या नित्य॥

चालः–येसाजी कंक रणशूर। तान्हा रणवीर। बाजी सरदार। बसले होते आजुबाजूला खास। पंताजी पंत हजर समयास। मनसुबा चालला युद्धाचा खास॥

चालः–इतक्यांत आला हेर स्थाना। वार्ता सांगतो रायाच्या काना॥ खान आला वांई प्रांताला। बारा हजार फौज संगतीला॥ वकील येइल तुमच्या भेटीला। दगा देण्याचा मनसुबा झाला॥

चालः–रायानें मनसुबा केला। मग बोलला समद्या मावळ्याला। तुम्ही तयार व्हावे युद्धाला। मिठ लागलं कितीक कणकिला। तशी गत खानाच्या कटकाला। जो तो लागला आपल्या कामाला। कोणी रोखून धरतो रस्त्याला। कोणी जमवी दारुगोळ्याला। कोणी जमवी आपल्या फौजेला। आन लागला जो तो आपल्या कामाला॥

चालः–गडगडाट झाला नरसिंहाचा खवळुनि गेला शिवसिंह। हिरण्यकश्यपु जसा फाडिला तसा फाडील हा सिंह॥

## चौक ५ वा

थरथर कापती किल्ले धास्तीनें आसें दाविती तो खानास। परी अंतरीं निर्भय होते भितीन कसली मुळींही त्यास॥ वांइ गावाहुन वकील निघाला कृष्णाजी भास्कर तो भेटण्यास। प्रताप गडावरी नीट चालला शिवभक्तिही तो बघण्यास॥ वकीला जवळी खलीता होता काय लिहिले त्या खलित्यांत। सांगेन सर्वां जरा थांबावं



कळेल पुढती या चौकांत॥ साम करावा येथ येऊनि जिवदान देतो मी तुम्हांस। जरी न आला तुम्ही येथवर रुष्ट होवोनी करूं युद्धास॥ गड किल्ले तै खाली करोनी पकडुन नेईन मी तुम्हांस। हालहाल करूनि ठार मारीन कोण सोडवील मग तुम्हास॥ प्रताप गडावरी वकील पोंचता वर्दी मिळाली शिवसर्जास। नेऊनी त्याला आंत बसवितां खलिता देतो शिवरायास॥ खलिता वाचुनि मनीं समजला दगा देईल तो आम्हांस। कपटाचरणीं कपट करोनि वागेन मुळीं मी या समयास॥ वकीलास राया काय म्हणाला उत्तर देतों उद्यां पत्रांत। तोंवरी तुम्ही स्वस्थ रहावें आराम करावा या महालांत॥ रात्र जाहली भिन्न काळोखी जनहि निजले तै मौजेंत। शिवरायाला निद्रा कोठली विचार चालले मन मोहल्यांत॥ विचार करोनी आज्ञा दुताला देवघरीं आणा त्या वकीलास। अंबा मातेला साक्ष ठेऊनि बेत खानाचा विचारीन त्यास॥

चालः–कृष्णाजी सांगा वार्तेला। ऐशा समयाला। द्याव भेदाला। अंबा साक्षीला। भसूर म्हणवुनि म्लेंच्छांतरीं कां शिरला?

चालः–हिंदभूमी पाहा गांजली। ब्राह्मणा नसे कोणी वाली। बघा गोवध करिती भर रस्त्यामधी। भिती नच उरली।

चालः–असे होती कितीक अनाचार। भरत भूमीवर। स्त्रिया आणि पोर। कितीक थोरथोर। निशी दिनीं घाला घालूनि बाटवी भरपूर॥ कित्येक देवळें फोडिलीं। लुटालूट केली। जाळपोळ झाली मसुद बांधिली। असे अनाचार वर्णावे कितीक भूतलीं॥ मी पडतों तुमच्या हो पायां। येऊं द्यावी दया। असुं द्यावी माया। भेद कासया। खटाटोप व्यर्थ हा दवडुं नका वायां॥ नका लावूं तुम्ही गळफास। हिंदुधर्मास। हिंद मातेस। आणि स्वजनास। परदास्यीं लोटुनी काय मिळेल तुम्हास॥

चालः–लावणें असेल तुम्हाला फांस। मान कांपा याच जागेस मान कापून व्हावें मोकळें। भेटा खानास॥

चालः–कृष्णाजी मनीं गहिंवरला । पाणी डोळयाला । इचार चालला । पेंच असा पडला । काय करूं सुचेना कांहीं मुळीं तें मजला ॥ कां फास देऊं देशाला । देऊन फासांला । मिळेल काय मला । थोडक्या पैशाला । फितुर म्हणवुनि काय अर्थ जगण्याला ।

चालः–फितुरांचे वाडे कधीं झाले । हालहाल होवोनि ते गेले । नाहीं पत्ता राहीला फासांवरी त्या दिले ॥

चालः–विवेकानें जय मिळविला । मनीं कळवळला । बोले शिव-बाला । साह्य तुम्हाला । झाला बेत खानाचा धरून न्यावें तुम्हाला ॥

चालः–जरी नच साधल समयाला तरी ठार करीन जागेला । विश्वास दावुनी खान बोलवी भेटीला ॥

चालः–शिवरायाला असें सांगुनी कृष्णाजी भास्कर काय वदला । न घ्यावी तुम्ही भेट खानाची । दगा देईल तो तुजला ॥ ५ ॥

## चौक ६ वा

चालः–शिवसर्जा बोलला तवा समद्या मावळयाला ॥ आला घाला माझे जीवाला पेच असा पडला ॥ पंताजी बोलला खानास बोलवा भेटीला ॥

चालः–बोलावून तोडा मुंडक्याला । शिवराय काय बोलला । असं कसं सांगता तुम्ही मला । हा धर्म नाहीं शास्त्राला । पाहुणा बोलावून कसं मारूं मी त्याला ॥ भ्यालोस दाखवीन त्याला । दाखवून बोलवून भेटीला । दगा केल्यास दगा देईन त्याला । सवा-रावी सदर पायध्याला । साफ करा जावळी खोऱ्याला । रस्ता तयार करावा त्यास येथें येण्याला ॥

चालः–कृष्णाजी पंता समावेत । गोपीनाथपंत । आले वांईंत । कृष्णाजीपंत बोलला खानास । जुव्वा थरथर कापतो तुम्हांस । भेटीस येईना वाई गांवास ॥ बोलविलें त्यानें तुम्हांस । जावळी



खोऱ्यास । यावें भेटीस । येतांच देतों किल्ले कोटास । पश्चाताप झाला पुरा आम्हांस । पुढें काय करू सांगा समयास ॥

चालः—खान सलाम करतो तुम्हाला । तुमचीच भिती आम्हाला । नांव ऐकतांच कंप सुटला । तुमच्यापुढें कसं राहूं युद्धाला । कुठं खान कुठं मी बोला । कुठं कोल्हा कुठं सिंह बोला । कसा काजवा दिपवील सुर्याला । जिवांत जीव नाहीं राहिला । अभयदान द्यावं तुम्ही मला ' मी शरण आलों तुम्हाला । पुंडावा केला तो नका आणुं ध्यानाला ॥ अंन पदरांत घ्यावं पोराला । घेऊन वांचवा माझे प्राणाला । खान निहात खुष मनीं झाला । हालवितो आपल्या दाढीला । अल्ला हो अक-बर बोल्ला । मेरा रोबाब कैसा है बोला । नुसतं नांव ऐकून घाम सुटला शिवजीला ॥ खान म्हणला जाऊं भेटिला । नाहीं भिती त्याची मुळीं मला । उन्दीर कसा मारील बोक्याला । तयारीचा कर्णा वाजला । घांव घातला त्यानं निशाणाला । कुच करून सैन्याला जाईल जावळी खोऱ्याला ॥ कृष्णजीपंत बोलला । घेऊ नका येवढ्या कटकाला । शिवा येणार नाहीं भेटिला । मंग काय फायदा तुमच्या जाण्याला । खान म्हणला कृष्णाजि पंताला । सैन्य कां घेतलं माझ्या संगतीला । तेंच कारण सांगतों तुम्हाला । जवळच ठेवून फौजेला । बार उडतांच बुड-वीन मावळयाला । दहांपांच लोक घेवुन जाईन भेटिला ॥

चालः— दिवस जाहला मुक्रर भेटीचा खान चालला वेगानं । पतंग घाली झडप दिव्यावर ओढून आणी हातीं मरण ॥६॥

## चौक ७ वा

मार्गशीर्षांतील शुद्ध सप्तमीस गुरुवारीं रोजीं दोहोपारास । शके पंधराशें एक्यांशी सालीं येईन भेटीस या समयास । वरील वक्ताला खान येईल खबर पोहोंचली प्रतापगडास । खबर पोहोंचता सरदार जमविले तांतडिनें तें दरबारांत ॥

चालः— मोरोशाम, रघुनाथ पेशवे । नारोशंकर आले होते ।

माणकोजी इंगळे देवकाते। जिवाजी सह तेव्हां आले ॥ सरसुभा बहीर्जी आले। ताना नेता येसाजी धांवले ॥

चालः— असं सरदार जमलं कचेरीला । जीवावर सोडून पाण्याला। तुम्ही राखलं माझ्या प्राणाला। सुख दिलं मूठ मातीला। देश कारणीं देह लाविला ॥

चालः— मावळयाशीं बोलतांना पाणी आलं डोळयाला। आतां कसं सांगु तुम्हाला। हे उपकार आतां फेडूं कोणत्या जन्माला ॥

चालः— मुंगी मारते बघा हत्तीला। हालाहाल वीष नागाला। सर्व भुजंग घेती जीवाला। जीव जंतु भितो भुजंगाला। मुंगसाची भिती भुजंगाला ॥

चालः— एवढासा मुंगुस ठार मारतो सर्पाला। मी जातों त्याचे भेटीला। जगलों वाचलों तर येईल तुमच्या भेटीला ॥

चालः— नाहींतर गादीवर बसवा उमाजी रावाला। दादानो रामराम घ्यावा लोभ तो ठेवा ॥

चालः— तानाजी बोलुं लागला। जाऊं नका त्याचे भेटीला। बर वाईट झालं जीवाला। मग आधार कोण आम्हाला। देशकार्य राहील बाजूला। त्यानं कधीं पाहिल तुम्हाला। म्हणूनच शिवाजी होऊन जातो भेटीला ॥

चालः— त्याच मुंडक तोडूनशान टांगून ठेवतो किल्याला ॥

चालः—जरी मारल खानानं मला। माझ्यासारख कैक गणतीला। मिळतील लोक तुम्हाला। शिरसलामत राहून मिळवाल पगडीला ॥ शिवराव बोलु लागला। असं फसवुं नये कोणाला। ज्यांच त्यानच जावं भेटीला। देव साहाय्य खऱ्या कामाला। मी जातों त्याचें भेटीला। तुम्ही सावध राहा जागेला। तुतारिचा परवल समद्याला। परवल होताच वेढा सदरेला। तोफांचे बार खुणेला। खुण होताच बुडवा फौजेला। लुटुन आणा त्याचे जिंदगीला। तानाजी पुढ काय बोलला शिव सर्जाला ॥

७८



चालः— दगाफटका करतांच खानान फाडून काढु तो मेंढा। फाडफाडुनि चिंध्या उडऊनी बळी देऊं आम्ही त्या मेंढया ॥७॥

## चौक ८ वा.

शिवाजीनें पोषाक चढविला स्वच्छ पांढरा सर्वांगा। सील लपटीले सर्व देहासीं अभंग झाला सर्वांगा ॥ स्वशिरा वरती पगडी चढविली शुभा तशीच जरतारी । जणुं शंभुच्या शिरीं शोभतो शशिबिंबची तमहारी ॥ शशिबिंबाच्या लहरी उसळतां तेज फाकतें चहु बाजूस । पुनरपि दिसतचि गुप्तची होती भास होतो हा प्रत्यही खास ॥ सिल्कामचा लखलखाट होतां तेज मावेना नभोदरांत । नभोदरांतील सौदामिनहि कडकड गरजे क्षणाक्षणा ॥ कडकड गरजुनी गुप्तची होता न दिसे पुन्हा ती माझारी। पुनःपुनः ती कडकड करुनी दृश्यची होतें नभोदरीं ॥ शिवरायाच्या शिरीं शोभली पगडी तशीच ही जरतारी। नररुपानें चंद्रमौली हा प्रगट जाहला भूमिवरी। भूमिवरीलया शिवशंभुच्या शिरीं न दिसे रजनिपति शोधून पहाता दिसे तुम्हां शिवरायाच्या वामांगीं ॥ वामांगीं तो येऊन बसता शिवरायाच्या कटीवरी । कटीवरी तो नित्यचि विलसे म्हणूनच म्हणा यवनारी ॥ त्यांतील शिलका लखलख करिते शिवरायाच्या सव्य करा। खड्गरुपानें दृश्यची होतां शत्रु भितीनें होतो पुरा ॥ खड्गरुपीं सौदामिनी दिसतां अरी पाहिना धैर्यानें। प्रलय कालचा कालची भासे म्हणूनच पळतीं वेगानें। कृष्णवदन तें करुनि पळतां पुन्हां येति ना माघारी । विजयानें तो परतुन येता डंका झडतो पृथ्वीवरी। वर्णन बहुतची करुन जाता पोवडा राहील बाजूला। मुख्यमुख्य ते भागची ऐसे शाहीर आणिती कवनाला। शिवरायाच्या हातीं वाघनख दुसऱ्या हातीं तो बिचवा। कमरे भोवतीं पट्टयाचा सळ त्यावरी शेला तो हिरवा ॥ जिवा महाल्यापर तरवार दिधली निःशस्त्राचा झोक पुरा। अंतरीं शस्त्रें [illegible] गनिमा कावा हाच खरा ॥ जगदंबेची पुजा करोनि

भक्तिन । जगन्मातेनं कौलची दिधला विजयीं हो तूं युक्तिनं । तेथन सर्जा नीट चालला जिजामातेच्या रं महालांत । चरणावरती शीर नमवितां अश्रु येती नयनांत ॥ पदकमलावरी अभिशेक केला टप टप गळत्या अश्रूंनं । धन्यची माता जिजामाउली काय बोललि प्रेमानं ॥ शूर विराच्या उदरीं येतां अश्रु येती नयनांत । काय जाहलें सांगरे शिवबा विकल जाहलें हृदयांत ॥ देशभक्तिच्या प्रेमाच्यागं उर्मी येती हृदयांत । जलरूपानें बाहेर पडती संशय आणी न चित्तांत । विजयश्री ही वरील मजला संदेह मजला किमपि न चित्तांत । आशिर्वच तूं देई ऐसा हिंदभुमीला करूं मुक्त ॥ करी धरोनी त्यास उठविलें शीर हुंगलें प्रेमानें । जेता होऊन राज्य स्थापिशील आशिर्वच तुज हा सत्य ॥ तव बंधुसी या खानानं ठार मारिलं कपटानें । कपटची दिसतां कपट करोनी सूड घेई तूं त्वेशानें ॥ वीर मातेनं नीरोप दिधला लिंबलोण ते उतरून । चीरंजीव हो बोले आशिर्वच परतून येशील विजयानें ॥ उंच बुरजावर भगवा झेंडा फडफड करतो डौलानं । फडफड करुनी काय बोलला टिळा लाव तूं रक्तानं ॥

चालः--शिवबानं वंदन केलं भवानी मातेला । आठवलं मनीं सद्‌गुरू रामदासाला । दोहीं पारची वेळ ती सूर्य आला माथ्याला ॥

धुम धडडड तोफांचे बार झाले समयाला । ही खूण समचा मावळ्याला । खानाचे भेटीशीं राया खालीं चालला ॥

चालः— कृष्णा घोडीवर स्वार होउनी राया लागे रस्त्याला सूर्य मंद तो तपो लागला ऊन लागेल रायाला ॥८॥

## चौक ९ वा

घोडी चालली अतिवेगानें मागें सारीत वायुला । झाडाझुडपांचा कोठें पत्ता भुमी कापते ताकांना ॥ हरिणासम ती उडधा मारीतं टाणटाण चाले रस्त्यानं । नदीनाले ते उडुनी जातेख डूडे तिच्या खिस-



गणतीत ॥ क्षण न लागतां राया पोंहोचला सदरेच्या दारांत । चहुबाजुला चौक्या ठेवूनी शिरेल राया मंग आंत ॥ या सदरेच्या चहुबाजुला जरीचं होतं कंतान । बैठकींत गालीचे पसरले गाद्या मढविल्या मश्रूनं॥ लोडावरी किनखाप चढवून हुक्का ठेविला बाजुने। दवणा पाचूच्या कुंडया ठेविता सुगंधे दरवळले रान ॥ चहु बाजूंचे खांब मढविले हिरेमाणिक मोत्यानं । कोंदणांतही पाचु बसविले हिरवे तांबडे ते छान ॥ मोत्याच्या झालरी लोंबती समया तेवती तेजानं । इंद्रसभेपरी शोभा आली भाग्य खानाच शिव धन्य ॥ शिवरायाच्या आधीं येऊन खान बसला ऐटीनं । शिवबाला मी धरून नेईन जप जपला तो गर्वानं ॥ सदरेंतील वैभव पाहून मनीं चरफडला तो खान । असलं वैभव शहासी नाहीं मिळवलं कैस शिवबानं ॥ कंस वधाया कृष्ण चालला मंद गतीनं वाडयांत । तसा येऊनी काळ खानाचा शीरेल सदरेच्या आंत ॥ आपल्या लोकांला इशारत देऊनी राया गेला सदरेंत । खानान-खानासी मुजरा करीता खान घेईना तोऱ्यांत ॥ परी खानासी भास दाविला मुजरा करीतों आपणांस । पण तो मुजरा केला होता शिवबानें त्या शंभूस ॥

चालः-खान बोले त्वेषानें त्यास । तुं शहा नाहींसरे खास । बंड करूनी जमवी द्रव्यास । भूषण दावीतो आम्हास । मराठयाचा ,करा आहेस । इसरूनी गेला तूं खास ॥

चालः-भटाऱ्याचं पोर तु ठाऊक आहे आम्हाला ॥ रोटी विकण्याचा धंदा सोडून येथें कां आला ॥ पाच्छाचे भेटीसी आज नेतों मी तुला ॥ फार वेळ लागेल तुजसी मला नेण्याला ॥

चालः-शिवरायासी खान बोलला । पोर मानलं आम्ही बघ तुला । भेटीचा योग छान आला । मर्दाई देखकर दील खुष बहु झाला ॥ शिवाजीनें हेतु जाणला । सर्जा भेटीसी सिद्ध जाहला ॥ कडकडून भेटले तेव्हां एकमेकांला ॥ खान उंच स्थूल देहाला । सर्जा लागला त्याचे खांद्याला । खानानं डाव टाकीला । शिवबाचे

दाबलं मुंडक्याला । शिवाजीनें हिसका मारीला । आन सोडवून घेतलय त्यानं आपल्या मुंडक्याला । वाघानं पंजा रोखला । निमिषांत ठेवला जागेला । टरटरां फाडलं पोटाला । आंतड्याचा दोर लोंबला । लळलळा आतडीं लोंबली सांभाळून त्याला ॥ खानानं वार मग केला । शिवबाचे मस्तकीं आला । जिरेटोप त्यानें छाटीला । थोडी जखम झाली डोक्याला । कमरेचा पट्टा सोडीला । खानावर तवा चालविला । खान अल्ला अल्ला बोलला । खान लवालवा बोलला । तोबा तोबा मुझे मार डाला । धरणीवर खान कोसळे त्याच वक्ताला ॥ उंदरानें मारल बोक्याला । रामानं मारलं रावणाला । कृष्णानं मारलं कंसाला । भीमानं मारलं किचकाला । तशी गत झाली खानाला । कपटाचं फळ कपटयाला । म्हणूनच खानाचा नाश झाला जागेला ॥ सय्यद् बंडा पुढें धांवला । सर्जाचे रोखें चालला । हात उचली प्राण घेण्याला । पण हात कुठें खालीं आला । त्याचे आधींच जिवानें बंडा ठार मारिला ॥ जिवा होता शिवा वाचला ॥ अशी म्हण आहे साक्षीला । खुणेचा कर्णा वाजला । खुण होतांच मावळा धांवला । खान घातला होता पालखीला । त्याच तोडुन घेतलं मुंडक्याला । रक्ताचा टिळा लाविला । खानाचं शीर घेऊन किल्यावर गेला ॥ शिर टांगल उंच बुरजाला । तोफेचा बार तवा झाला । बार होतांच मावळा धावला ॥

चालः—झाडझुडप ती हालू लागली जीव आला त्या रानास सजीव होवोनी मागे लागली कळेना कारवाई त्या सैन्यास ॥ सैतान आया दौडो बोले गाठले त्यानें रे आम्हांस । पोराबाळांला मुकलों आम्ही आग लागो रे त्या खानास ॥ गर्व खानाचा व्यर्थची गेला मुकलों आम्ही स्वप्राणास । शिवाजी कसला हातीं लागतो सर्वही सांपडलों आम्ही त्यास ॥

चालः— चरचरा कांपलं शत्रूला । असुदाचा पूर लोटला । यवनांचा फडशा पाडीला । लूटून आणिती हत्ती घोडे द्रव्याला ।



गडावर उत्सव झाला ॥ मंग आणलं अज्ञान दासाला । त्याच्या ... आणि



चालः— दगाफटका करतांच खानान फाडून काढु तो मेंढा । फाडफाडुनि चिंध्या उडऊनी बळी देऊं आम्ही त्या मेंढया ॥७॥

## चौक ८ वा.

शिवाजीनें पोषाक चढविला स्वच्छ पांढरा सर्वांगा । सील लपटीले सर्व देहासीं अभंग झाला सर्वांगा ॥ स्वशिरा वरती पगडी चढविली शुभा तशीच जरतारी । जणुं शंभुच्या शिरीं शोभतो शशिबिंबची तमहारी ॥ शशिबिंबाच्या लहरी उसळतां तेज फाकतें चहु बाजूस । पुनरपि दिसतचि गुप्तची होती भास होतो हा प्रत्यही खास ॥ सिल्कामचा लखलखाट होतां तेज मावेना नभोदरांत । नभोदरांतील सौदामिनहि कडकड गरजे क्षणाक्षणा ॥ कडकड गरजुनी गुप्तची होता न दिसे पुन्हा ती माझारी । पुनःपुनः ती कडकड करुनी हृदयची होतें नभोदरीं ॥ शिवरायाच्या शिरीं शोभली पगडी तशीच ही जरतारी । नररुपानें चंद्रमौली हा प्रगट जाहला भूमिवरी ।